| लातूर | वर्ष ३५ वे | अंक ९५ वा | सोमवार, दिनांक २९ जून २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# नसरापूर प्रकरण- नराधमाला फाशीची शिक्षा

## गुन्हा घडल्यापासून अवघ्या ६० दिवसांत फास्ट ट्रॅक कोर्टाचा ऐतिहासिक निकाल

**पुणे/प्रतिनिधी** :-पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे अवघ्या साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर पाशवी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या भीमराव कांबळे (वय ६५) या नराधमाला पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाने (सोमवारी, २९ जून) मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा ऐतिहासिक निकाल दिला. विशेष म्हणजे, गुन्हा घडल्यापासून अवघ्या दोन महिन्यांत आणि खटल्याची सुनावणी केवळ १६ दिवसांत पूर्ण करून निकाल देण्यात आलेला हा राज्यातील पहिलाच आणि सर्वात जलदगतीने निकाली लागलेला खटला ठरला आहे.

चार दिवसांपूर्वी (२५ जून) न्यायालयाने कांबळेला दोषी ठरवले होते, मात्र शिक्षेचा निर्णय राखून ठेवला होता. आज अंतिम निकाल देताना न्यायाधीशांनी नोंदवलेली निरीक्षणे अत्यंत हादरवून टाकणारी होती.

**कोर्टरूम लाईव्ह: न्यायाधीशांनी नोंदवलेली गंभीर निरीक्षणे**

निकालाचे वाचन करताना विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी आरोपीच्या क्रूरतेवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले.



हत्येनंतरही अत्याचार, फाशीही अपुरीच: आरोपीने चिमुकलीला जिवंत राहण्याचा कोणताही पर्याय ठेवला नाही. तिच्यावर अमानुष अत्याचार केले, एवढेच नाही तर हत्येनंतरही त्याने तिच्या मृतदेहावर लैंगिक अत्याचार केले. अशा नराधमाला फाशीची शिक्षा देखील अपुरीच आहे.

**क्रूरतेचा कळस:** मुलीच्या अंगावर तब्बल १८ जखमा होत्या. तिचा श्वास कोंडण्यासाठी तिची पँट तिच्या तोंडात २१ सेंटीमीटर आत कोंबण्यात आली होती. असहाय्य मुलीने अतोनात वेदना सहन केल्या.

**दुर्मिळातील दुर्मिळ घटना:** आरोपीने सुधारण्याची पातळी कधीच ओलांडली आहे. त्याचा पूर्व इतिहास पाहता (यापूर्वी ५३ वर्षांचा असताना त्याने कुटुंबातील मुलीवर आणि एका वृद्धेवरही अत्याचार करण्याचा प्रयत्न केला होता) त्याला कोणताही पश्चात्ताप नाही. ही घटना 'दुर्मिळातील दुर्मिळ' श्रेणीत मोडते.

कायद्याचे दाखले आणि विशेष सरकारी वकिलांचा युक्तिवाद

विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी या प्रकरणात आरोपीला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या १२ निकालांचे दाखले दिले. या सर्व निकालांचे नसरापूरच्या घटनेशी साधर्म्य होते.

न्यायाधीशांनी अंतिम निकाल देताना 'निर्भया प्रकरण', 'बशर अली केस', 'शंकर खाडे केस' आणि 'बच्चन सिंग विरुद्ध स्टेट ऑफ पंजाब' या प्रकरणांचे दाखले दिले.

शांत डोक्याने कट रचून केलेली हत्या, गुन्ह्यातील क्रूरता आणि या घटनेमुळे समाजाला बसलेला धक्का हे सर्व घटक फाशीच्या शिक्षेसाठी पात्र ठरतात. स्वतःची वासना पूर्ण करण्यासाठी असहाय्य बालिकेसोबत केलेले हे कृत्य अमानवी आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

**तपास यंत्रणा आणि टीम वर्कचे कौतुक**

या निकालादरम्यान न्यायालयाने पोलीस आणि तपास यंत्रणांच्या कामाचे तोंडभरून कौतुक केले.

गुन्हा घडल्यानंतर अवघ्या १६ दिवसांत पोलिसांनी भक्कम आरोपपत्र दाखल केले. उन्हाळ्याच्या सुट्टीतही कोर्टाने या खटल्याला पूर्ण वेळ दिला. ५५ साक्षीदार तपासले गेले. डॉक्टर, सायबर तज्ज्ञ आणि फॉरेन्सिक टीमने वाखाणण्याजोगी कामगिरी केली. पोलिसांनी उत्कृष्ट तपास केल्याबद्दल ते अभिनंदनास पात्र आहेत.

असा जलद न्याय मिळणे हे एक स्वप्न असते, जे सर्वच प्रकरणांत शक्य होत नाही. मात्र, या प्रकरणातील टीम वर्क आणि विशेष सरकारी वकिलांचा पाठपुरावा सर्वांसाठी एक आदर्श उदाहरण आहे, असे न्यायाधीश म्हणाले.

**फास्ट ट्रॅक न्यायालयात वेगवान सुनावणी**

राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेत खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्याचा निर्णय घेतला. पुणे ग्रामीण पोलिसांनी अवघ्या १६ दिवसांत आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर न्यायालयात वेगाने सुनावणी पार पडली. या खटल्यात ५५ हून अधिक साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली असून सीसीटीव्ही फुटेजसह विविध तांत्रिक पुरावेही न्यायालयासमोर सादर करण्यात आले. आजच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्हा व सत्र न्यायालयाबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. न्यायालय परिसरात नागरिकांचीही मोठी गर्दी झाली.

## कलकोटीत अवैध दारूविक्री विरोधात महिलांचा एल्गार; दारू विक्रेत्याला चोप

**चाकूर/प्रतिनिधी:** तालुक्यातील कलकोटी गावात सुरू असलेल्या विनापरवाना व अवैध दारूविक्रीच्या विरोधात शनिवारी सकाळी नऊच्या सुमारास संतप्त महिलांनी आक्रमक पवित्रा घेत एका दारू विक्रेत्याच्या थेट घरात घुसून त्याला चांगलाच चोप दिला. या घटनेमुळे गावात एकच खळबळ चाकूर तालुक्यात गेल्या अनेक दिवसांपासून बऱ्याच गावात बेकायदेशीर दारूविक्री सुरू आहे. त्यांना पोलीस कारवाईची भीती राहिली नाही. अवैध दारू ही गावोगावी मिळत असल्यामुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असल्याचा आरोप ग्रामस्थ व महिलांनी केला आहे.

वारंवार तक्रारी करूनही पोलिस प्रशासनाने ठोस कारवाई केली नसल्याने अखेर महिलांचा संयम सुटला आणि शनिवारी सकाळी कलकोटी गावात त्यांनी स्वतःच अवैध दारू विकणाऱ्याच्या घरात घुसून थेट कारवाईचा बडगा उचलला आहे. या अवैध दारूविक्रीमुळे गावातील शांतता, सामाजिक वातावरण आणि अनेक कुटुंबांचे आर्थिक व मानसिक नुकसान होत असल्याचा आरोप महिलांनी करून संबंधितांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

दरम्यान, या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस प्रशासनाने अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून अवैध दारूचा व्यवसाय कायमस्वरूपी बंद करावा, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. दरम्यान शनिवारी चाकूर पोलीसांनी अनेक ठिकाणी छापेमारी करीत अवैध दारू विक्री विरोधात कठोर कारवाई केली आहे. कलकोटीत अवैध दारू विक्रेत्याला आणि मषनेरवाडीत एका धाबा चालकाला ताब्यात घेतले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक बालाजी भंडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक किरण रायझुबे यांच्या पथकाने केली आहे.

## प्रभात किरणे

जे विसरतात,विसरायला शिकाव
जे टाळतात,टाळायला शिकाव
जे जळतात,विजवायला शिकाव
जे जीव लावतात,जपायला शिकाव

-इंजि. नागनाथ कलवले

लातूर ९७६४७ ८८२८८

## वट पौर्णिमा झाली हरित क्रांतीचा उत्सव



**लातूर/प्रतिनिधी:** भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणामागे निसर्गाशी असलेले अतूट नाते आणि वैज्ञानिक विचार दडलेला आहे. या परंपरेचे जतन करत पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन ने नेहमीप्रमाणे यंदाचा ही वट पौर्णिमा उत्सव अत्यंत उत्साहात, पारंपरिक पद्धतीने आणि पर्यावरणपूरक स्वरूपात साजरा केला.

या उपक्रमात २०० वडाच्या झाडांच्या रोपांचे मोफत वाटप, २२ मोठ्या वडाच्या झाडांचे रोपण, तसेच महिलांच्या हस्ते वट वृक्षाचे रोपण करत, वट वृक्षाची विधिवत पूजा व प्रसाद वितरण करण्यात आले. त्या शिवाय नांदेड रस्ता कृषी महाविद्यालय मार्गावर ८० मोठ्या कडुनिंबाच्या झाडांची लागवड करून हरित संवर्धनाचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला. या आगळ्या वेगळ्या वट पौर्णिमा आणि वट वृक्षाचे रोपण उपक्रमाला राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय प्रा. गव्हाणे सर तसेच उपप्राचार्य प्रा. शिंदे सर यांची सपत्नीक प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी संस्थेच्या सातत्यपूर्ण पर्यावरण कार्याचे कौतुक करत समाजाने अशा उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होण्याचे आवाहन केले. प्रत्येक सण झाडांसोबत ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवत आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशनने वट पौर्णिमेला केवळ धार्मिक उत्सव न ठेवता तो पर्यावरण संवर्धनाचा लोकउत्सव बनविला. महिलांनी पारंपरिक वेशभूषेत वटवृक्षाची पूजा करत भारतीय संस्कृतीचा गौरव केला, तर वृक्षारोपणाद्वारे भावी पिढ्यांसाठी हरित भविष्याचा संकल्पही दृढ केला.

वटवृक्ष हा दीर्घायुष्य, स्थैर्य, सावली, जैवविविधता आणि पर्यावरणीय समतोलाचे प्रतीक मानला जातो. त्यामुळे वट पौर्णिमेसारख्या सांस्कृतिक सणांमधून वृक्षसंवर्धनाचा संदेश देणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे मत डॉ. भास्कर बोरगावकर यांनी व्यक्त केले.

गेल्या सलग २५८६ दिवसांपासून पर्यावरण संवर्धन, वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन आणि संरक्षणासाठी अखंडपणे कार्यरत असलेल्या आमचं ग्रीन लातूर वृक्ष फाऊंडेशन ने पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणप्रेम यांचा सुंदर संगम घडवून आणला. संस्कृती, परंपरा आणि विज्ञान यांची सांगड घालत प्रत्येक सण हरितमय करण्याचा संस्थेचा संकल्प समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे. सण जपूया, संस्कृती जपूया आणि प्रत्येक सण एका नव्या वृक्षासोबत साजरा करून पर्यावरण वाचवूया अशा भावना डॉ. पवन लड्डा यांनी व्यक्त करत उपास्थित मान्यवर आणि सदस्यांचे आभार मानले.

## चाकूर येथील दरोडा प्रकरणाचा उलगडा, एक आरोपी जेरबंद; १७ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्ह्यात मालमत्तेविरुद्धचे गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या देखरेखीखाली स्थानिक गुन्हे शाखेने उल्लेखनीय कामगिरी नोंदवित स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने चाकूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दरोड्याच्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या काही दिवसांत उलगडा करून एका आरोपीला अटक केली असून, त्याच्याकडून चोरीतील सोन्याचे दागिने व गुन्ह्यात वापरण्यात आलेली बोलेरो जीप असा १७ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३३७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १२६(२), ३०९(६) व ३(५) अंतर्गत दरोड्याचा गुन्हा दाखल होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांनी पथकाला विविध तांत्रिक माहिती आधारे जाळे आणि सराईत गुन्हेगारांच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या होत्या.

दिनांक २७ जून २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग व्यंकट माने यांच्या नेतृत्वाखालील पथक गुन्हेगारांचा शोध घेत असताना माहिती मिळाली की, दरोड्यात चोरीस गेलेले सोन्याचे दागिने विक्री करण्याच्या उद्देशाने काही संशयित इसम ढोकी-मुरूड मार्गावर येणार आहेत. मिळालेल्या माहितीची खातरजमा करून नियोजनबद्ध सापळा रचला. काही वेळात संशयित महिंद्रा बोलेरो घटनास्थळी आली. पोलिसांनी वाहन अडविण्याचा प्रयत्न करताच वाहनातील तिघांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पथकातील पोलिसांनी तात्काळ पाठलाग करून

रवि मोहन काळे (वय १९ वर्षे, रा. खामकरवाडी पारधीपेढी, ता. वाशी, जि. धाराशिव) यास शिताफीने ताब्यात घेतले. मात्र त्याचे इतर साथीदार पोलिसांची चाहूल लागताच घटनास्थळावरून पसार झाले.

गुन्हेगार व वाहनाची सखोल झडती घेतली असता बोलेरोमध्ये ठेवलेल्या पिशवीत दोन सोन्याचे मंगळसूत्र, चार सोन्याच्या अंगठ्या व एक चांदीची चैन असा मौल्यवान ऐवज आढळून आला. त्यानंतर विश्वासात घेऊन चौकशी केली असता त्याने आपल्या फरार साथीदारांसह दिनांक २० जून २०२६ रोजी नांदेड- लातूर मार्गावर दोन कार अडवून प्रवाशांना मारहाण करून त्यांच्याकडील सोन्याचे दागिने व रोख रक्कम जबरीने लुटल्याची कबुली दिली. त्यानंतर जप्त केलेल्या दागिन्यांची तपासणी केली असता सदर ऐवज चाकूर पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक ३३७/२०२६ मधील चोरीस गेलेला मुद्देमाल असल्याचे निष्पन्न झाले. यानंतर आरोपीला ताब्यात घेऊन त्याच्याकडील संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेला मुद्देमाल पुढील प्रमाणे ४३ ग्रॅम ५ मिली वजनाचे सोन्याचे दागिने (दोन मंगळसूत्र, चार अंगठ्या), चांदीची चैन किंमत ०६ लाख २२ हजार रुपये, महिंद्रा बोलेरो जीप असा ११,००,००० असा एकूण जप्त मुद्देमाल १७,२२,०००/- इतकी आहे.

या गुन्ह्यात अनिल उर्फ शेंड्या आबा काळे, छगन उर्फ पवन महादेव काळे, महालिंग अर्जुन काळे, राहुल अंकुश शिंदे व कृष्णा मोतीराम शिंदे (सर्व रा. खामकरवाडी पारधी पेडी, ता. वाशी, जि. धाराशिव) हे आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत.

आरोपीला व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी चाकूर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या देखरेखीखाली तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, अमित पुणेकर, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, अमर केंद्रे पोलीस अंमलदार युवराज गिरी, संजय कांबळे, मोहन सुरवसे, सूर्यकांत कलमे, राजेश कंचे, प्रदीप स्वामी, सिद्धेश्वर मदने, काकासाहेब बोचरे, राहुल कांबळे, जमीर शेख, तुळशीराम बरुरे, पाराजी पुटेवाड, गोविंद भोसले, चंद्रकांत केंद्रे, संतोष खांडेकर, बंडू नीटुरे, शैलेश सुडे, अंजली गायकवाड, रामदास बाचीफळे, गोरोबा इंगोले, दयानंद सूर्यवंशी, पोलीस फोटोग्राफर सुहास जाधव यांनी कौशल्य आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडली.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



राज्यातील काही भागात पावसाचा कहर-पुरसदृश्य परिस्थिती......

## रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनची जॉईंट क्लब असेम्ब्ली संपन्न नवीन वर्षात दिल से कार्य करण्याचा दृढ संकल्प




**लातूर/प्रतिनिधी:** रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत कार्यरत असलेल्या रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनने लातूर जिल्ह्यातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, दिव्यांग कल्याण व समाजसेवा या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

नुकतीच रोटरी क्लब ऑफ लातूर होरायझनची जॉईंट क्लब असेम्ब्ली संपन्न झाली असून पुढील वर्षात दिल से कार्य करण्याचा सर्वांनी दृढ संकल्प केला आहे.

या कार्यक्रमाला भावी सहाय्यक प्रांतपाल (२०२६-२७) रो.डॉ. राजगोपाल तापडिया, अध्यक्ष रो. डॉ.गुणवंत बिरादार, भावी अध्यक्ष (२०२६-२७) रो.डॉ.माधव गोरे, भावी सचिव (२०२६-२७) रो.डॉ. घनश्याम ताडेवार, माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी, रो.बी. पी.सूर्यवंशी, रो.डॉ.संजय गवई, रो. निळकंठ स्वामी, रो.महादेव पांडे, रो.प्रा.माधव नायने, रो.प्रा.सिद्धलिंग गुजर, रो.बापूसाहेब सांडूर यांची प्रमुख उपस्थिती होती

सभेची सुरुवात रोटरीच्या नियमानुसार राष्ट्र गीत आणि फोर वे टेस्ट वाचनाने करण्यात आली, क्लब सेक्रेटरी रो.डॉ.घनश्याम ताडेवार यांनी मागील मीटिंगचा अहवाल वाचन करून सर्वांचे शब्द सुमनांनी स्वागत केले.

अध्यक्ष रो.डॉ. गुणवंत बिरादार यांनी क्लबद्वारे गेल्या वर्ष भरात केलेल्या कार्याचा आढावा घेऊन अहवाल सादर केला आणि सर्व सदस्यांचे कौतुक करून आभार व्यक्त केले आणि पुढे ही दिलसे कार्य करण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला.

नूतन सहायक प्रांतपाल रो.डॉ. राजगोपाल तापडिया यांचे आगमन होताच क्लबच्यावतीने माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी यांच्या हस्ते त्यांचे शाल व भेट वस्तू देऊन स्वागत करण्यात आले.

रोटरी वर्ष २०२६-२७चे अध्यक्ष रो.डॉ.माधव गोरे आणि सेक्रेटरी रो. डॉ.घनश्याम ताडेवार यांना मंचावर आमंत्रित करण्यात आले. रो. डॉ.माधव गोरे यांनी नवीन इजऊ चे वाचन करून पुढील वर्षाचे नियोजन सांगितले. सहायक प्रांतपाल रो.डॉ. राजगोपाल तापडिया यांचा परिचय रो.डॉ.संजय गवई यांनी करून दिला.

सहायक प्रांतपाल रो.डॉ. राजगोपाल तापडिया यांनी आपल्या मार्गदर्शनपर संबोधनात क्लबच्या कार्याचे कौतुक करून पुढेही क्लब अगदी याच उत्साहाने कार्य करील अशी आशा व्यक्त केली. तसेच सर्व सदस्यांना आपली मतं व्यक्त करण्यास सांगितले. या चर्चेत माजी प्रांतपाल रो.डॉ.विजयभाऊ राठी यांनी त्यांना मिळालेल्या इनसिनीरेटर पेटंटवर मिळणारा लाभांश क्लबला दान करण्याचे आश्वासन दिले.

सचिव रो.डॉ.घनश्याम ताडेवार यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

## चाकूर अर्बन निधी लि.चाकूर शाखा नळेगाव नूतणीकरण



**नळेगाव/अजगर मजकुरी:** २८ रोजी चाकूर अर्बन निधी लि.चाकूर शाखा नळेगाव नूतनीकरण उदघाटन समारंभ चाकूर अर्बनचे चेअरमन .युनूस मासुलदार यांच्या हस्ते संपन्न झाला या कार्यक्रम समारंभ निमित्त लातूर मल्टीस्टेटचे चेअरमन इसरार सगरे, साईबाबा बँकचे व्हॉईस चेअरमन सोनू डगवाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पतसंस्थेचे चेअरमन ॲड.सुनील कांबळे, साईबाबा बँकचे उपमुख्यकार्यकारी अधिकारी शाहिद शेख,लोकमतचे उपसंपादक अशपाक पठाण, बातमी मागची बातमीचे संपादक जावेद भाई शेख,संजय गांधी निराधार योजना समितीचे सदस्य ॲड संतोष माने, ओसामा मासूलदार,महेश सूर्यवंशी, नळेगावचे सरपंच सूर्यकांतराव चव्हाण, देवंग्राचे सरपंच नामदेव शिंगडे,शिवाजीराव वाघमारे, नामदेव नरवाडे,घोरवाडे खुदबुद्दीन,घोरवाडे अमजद, डॉ.बालाजी पांचाळ, डॉ. सय्यद शब्बीर, डॉ.शेटे उमाकांत, पत्रकार दयानंद सूर्यवंशी ,पत्रकार दत्ता मेहकरे ,पत्रकार अजगर मचकुरी ,पत्रकार अशोक बिराजदार ,उमाकांत फुलारी,रजाक मासूलदार, संतोष मोरे, रमेश जनवाडे,बालाजी मोरे, बालाजी कोंडमगिरे,मानखेडे पांडुरंग, गुरुनाथ पाटील सभासद सर्व शाखेतील शाखा अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते



## चिमटा

दयाचा

पावसाने गटरीचे पाणी घरात
व रस्त्यावर आले आहे!
हीच पावसाळापुर्व कामाची
गुणवत्तेची पावती आहे!!
याला माफी आहे म्हणून अशीच
गुणवत्ता राहाणार आहे!!

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भेसळ व गुटखा यावरच चर्चा होत आहे

राज्यात आता भेसळ प्रकरणे उघडी पडत आहेत व मोठ्या प्रमाणता गुटखा पकडला जात आहे. या दोन प्रकरणाने राज्यात चर्चेला उधाण आले आहे. वास्तविक दोघावरही बंदी आहे. तरी राजरोसपने हा गैरधंदा केला जात आहे. कोणाचे अभय आहे हे कळून येत नाही. निंभियपने ह्या बाबी चालू आहेत हे उघड आहे. वास्तविक भेसळीचे प्रकरणे तुकाराम मुंडे यांच्या हाती या खात्याचा कारभार आल्याने धडाक्यात कारवाई सुरु केली आहे. अनेकांनी चुकीचा व्यवसाय बंद केला आहे. राज्यात अनेक ठिकाणी धाडी टाकल्या जात आहेत. मुळात खाद्य पदार्थ जे दुधापासून बनतात तेवढे दुधाचे उत्पादन होत नाही. दुधजन्य पदार्थ दुप्पट बाजारात मिळते आहे. सध्याला गायी-म्हसीचे प्रमाण कमी झाले आहे. तरी दुधापासून अनेक उत्पादने बाजारात विपुल प्रमाणात मिळतात. या बाबत कोनोसा घेतल्यास काही दुधजन्य पदार्थ भेसळीचे आहेत हे उघडे पडत आहे. भेसळ ओळखणे हे जनसामान्यांचे काम नाही किंवा त्यांना ओळखता येत नाही. यासाठी राज्य शासनाचा अन्न व भेसळीचा विभाग आहे. जिल्हास्तरावर कार्यालये आहेत. त्यांची कामे भेसळ होत असेल, जनतेच्या जीवाशी कोणी खेळ खेळत असेल तर त्याला रोखणे हा आहे. जसे औषधी दुकानात तारीख बाद झाली तर ती विकू न देणे, जप्त करणे, अन्नातून भेसळ करीत असेल तर रोखणे आदि महत्वाची कामे होतात. विशेष करून दुधजन्य पदार्थात मोठी भेसळ होते हे आता उघडे पडले आहे. ठराविक जनतेच्या ताटातविष कालविण्याचे काम होते आहे. अन्ना बरोबर फळाचे सुद्धा असेच होत आहे. फळ लवकर पिकावे म्हणून केमिकल्सचा किंवा इंजेक्शनचा वापर केला जात असल्याचे प्रकरणे उघडी पडली आहेत. मुळात भेसळ करणाऱ्यावर कडक कारवाई होत नाही. त्यामुळे भिती उरली नाही. तपास जलद गतीने होत नाही. तपासात दिरंगाई होते. त्याच प्रमाणे यातून निर्दोश सुटण्याचे प्रकार अधिक होतात. वास्तविक राज्यात मोठ्या प्रमाणात भेसळ होते हे सरकारला माहिती असले पाहिजे. सरकारकडे मोठ्या प्रमाणात माहितीची यंत्रणा असते. अन्न व भेसळ वाल्यांना कोठे भेसळ होते हे चांगले माहिती असते. त्यांचे ते कामच आहे. आता पर्यंत हा विभाग झोपलेला होता. आता तुकाराम मुंडे यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर बरीच प्रकरणे उघडी पडली आहेत. हा जनतेचा आशिर्वाद तुकाराम मुंडे घेत आहेत. अन्नात विष कालविण्याचे काम होत होते. हे आता जतनेला कळून आले आहे. बऱ्याच बाबी अशा आहेत की, त्यात सहज भेसळ करणे शक्य आहे. हे प्रशासनला माहिती नाही असे होत नाही. सर्व माहिती असताना गैरप्रकाराने अशी प्रकरणे झाकली जातात ही बाब जतनेला देखिल माहिती आहे. मुळात सर्वत्र दुषीत वातावरण आहे. तरी त्याला आडविले जात नाही किंवा रोखले जात नाही. भेसळ दुध जन्मलेल्या मुलीस दिले जात असेल तर सर्वात मोठे पाप आहे. मुळात अधिक कमाईच्या नादात इतरांचे आरोग्य धोक्यात टाकले जात आहे. मुळात देशात केमिकल्सचा वापर अधिक प्रमाणात होत आहे. पुर्वी पेक्षा रासायनिक पदार्थ अधिक वापरली जात आहेत हे उघड आहे. इतर बाबत भेसळ होते असेल तर दुर्लक्ष करू मात्र अन्नात भेसळ होत असेल तर जनता खपवुन घेणार नाही. वास्तविक आता कोठे शुद्ध वस्तू मिळतात असे नाही, सर्व अशुद्ध व भेसळीचे पदार्थ घ्यावे लागत आहे. साधे व सोपे गणित असे आहे की, जनतेला लागणाऱ्या वस्तु ह्या आरोग्यास धोकादायक नसाव्यात असे वाटत असले तरी समाजात विघातक शक्ती कार्यरत असते ती भारतीयांचे आरोग्य बिघडावे, प्रजनन शक्ती कमी व समाप्त व्हावी असे केमिकल्स काही बाबतीत मिसळून देत असल्याचे उघड झाले होते. मुळात भेसळ आहे का नाही हे ओळखण्याचे ज्ञान सामान्य नागरिकांना नसते. ते केवळ अन्न व भेसळ कार्यालयातील कर्मचारी ओळखू शकतात. त्यामुळे यापुढे जनतेला भेसळ ओळखण्यासाठीचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. प्रत्येकात भेसळ आहे का नाही हे ओळखण्याचे ज्ञान दिले तर भारतीयांचे आरोग्य सदृढ राहील. देशाची खरी संपत्ती ही निरोगी जनता आहे. बलशाली जनता आहे हे लक्षात ठेवावे. जनताच रोगी असेल व शत्रुला लढण्याची ताकद संपते तर देश सुरक्षित राहु शकत नाही. सर्वात महत्त्वाचे कार्य हे भेसळजन्य पदार्थ जनतेला खावु न घालणे हा आहे. किती पदार्थात भेसळ केले गेले हे आता उघडे पडत आहे. कोणत्या पदार्थात सहज भेसळ करता येते इे घडत झाले आहे. या बाबत जनतेच्या सुरक्षितेबाबत तुकाराम मुंडे काम गौरवशाली आहे हे मान्यच केले पाहिजे. जसे भेसळीचा प्रकार होतो तसे गुटखा बंदी असून मिळत आहे. या बाबत यश किंवा अपयश कोणाचे आहे याचा विचार केला पाहिजे. गुटखा बंदी आहे. कारखाने बंद केली गेली आहेत मग गुटखा मिळतो कसा वास्तविक गुटखा हा परराज्यातून येतो तोही चोरट्या मार्गाने येत आहे. महाराष्ट्रात गुटखा बंदी आहे मात्र इतर राज्यात गुटखा उत्पादित होते तेथून येत आहे. गुटखा हा चोरट्या मार्गाने राज्यात येताना अनेकदा पकडले जाते. यावर कडक कारवाईची गरज आहे. गुन्हेगारास कडक शिक्षेची तरतुद असली पाहिजे. सध्याला काय होते, गुटखा पकडला की, जप्त केला जातो. व्यक्तीला या बाबत शिक्षा कडक होणे अपेक्षित आहे. तरच पायबंद बसेल. नसता या बाबत कडक कारवाई होत नसल्याने गुटखा सहज मिळतो आहे. या बाबत पोलिस यंत्रना सतर्क राहीली पाहिजे. वास्तविक पाहाता भेसळ असो किंवा गुटखाबाबत जनताच जागृत असली पाहिजे. जनतेनी आता भेसळ करणाऱ्यास व चोरून गुटखा विकणाऱ्यावर लक्ष ठेवुन प्रशासनास कळविले पाहिजे. नागरिक म्हणून आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. केवळ सरकार किंवा प्रशासन या बाबत लक्ष देवुन कारवाई करेल असा विचार करू नये. जनता व प्रशासन मिळून भेसळ व गुटख्यावर प्रहार केल्यास हे सहज हद्दपार होवू शकतात. गुटखा खाणे आरोग्यास धोकदायक आहे. असे असताना तो चघळला जातो. अनेक पान टपऱ्यावर मिळतो. शाळेजवळ पान टपऱ्या नसाव्यात असे निर्देश असताना आजही शाळा व धार्मिकस्थळाजवळ पानटपरी आहेत. तुकाराम मुंडे यांच्या भितीपोटी पानटपऱ्या बंद आहेत. त्यामुळे बंद असणाऱ्या टपऱ्यामधुन गुटखा सहज मिळतो असे समजणे चुकीचे नाही. काही झाले तरी आता जनतेनी जागृत राहुन याबाबत लढा दिला पाहिजे. समाजासाठी घातक असल्याला बाबी जडीपार केल्या पाहिजे हे लक्षात ठेवेल पाहिजे.

# बळीराजाला देतेय बळ..

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

महाराष्ट्रातील बळीराजाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि त्याला पुन्हा एकदा स्वाभिमानाने उभे करण्यासाठी राज्य शासनाने नुकतेच ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमुक्ती योजना जाहीर करण्यात आली असून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' असे या योजनेचे नाव आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**३६ हजार कोटींपेक्षा अधिक रकमेची कर्जमुक्ती**

या योजनेच्या माध्यमातून राज्य शासनाने तब्बल ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी मंजूर केली आहे. या अवाढव्य आर्थिक तरतुदीमुळे राज्यातील सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी आणि शेती क्षेत्राला गती देण्यासाठी हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.


**योजनेचे मुख्य निकष आणि लाभ**

२ लाखांपर्यंत कर्जमाफी: ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ज्या पात्र शेतकऱ्यांचे पीक कर्ज थकीत आहे, अशा शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमुक्ती दिली जाणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन:**

जे शेतकरी प्रामाणिकपणे आणि वेळेवर आपल्या कर्जाची परतफेड करतात, त्यांच्यावर अन्याय होऊ नये म्हणून शासनाने विशेष तरतूद केली आहे. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

नव्याने पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा: जुन्या कर्जाच्या बोज्यातून मुक्त झाल्यानंतर, शेतकऱ्यांना आता खरीप आणि रब्बी हंगामासाठी नव्याने पीक कर्ज मिळणे अत्यंत सोपे होणार आहे.




जमीनधारणेची अट नाही: या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लाभ देताना 'वैयक्तिक शेतकरी' हाच एकमेव निकष मानला गेला आहे. जमीनधारणेचा (जमिनीच्या क्षेत्राचा) कोणताही विचार न करता प्रत्येक पात्र शेतकऱ्याला या योजनेचा लाभ दिला जाईल.

**सुलभ प्रक्रिया: स्वतंत्र अर्जाची गरज नाही!**

शेतकऱ्यांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत म्हणून शासनाने प्रक्रिया अत्यंत सुलभ ठेवली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना कोणताही स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता नाही. फक्त आधार प्रमाणीकरण (Aadhar Authentication) पूर्ण करणे बंधनकारक असेल. आधार प्रमाणीकरण होताच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीचा लाभ वर्ग केला जाईल.

**प्रभावी अंमलबजावणीसाठी उपसमितीची स्थापना**

योजनेचा लाभ शेवटच्या घटकांपर्यंत पारदर्शकपणे आणि वेळेत पोहोचावा, यासाठी एका विशेष उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे. अंमलबजावणी दरम्यान येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि आवश्यकतेनुसार तातडीने निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार या उपसमितीला देण्यात आले आहेत.

आर्थिक अडचणींमुळे खचलेल्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा शेतात आत्मविश्वासाने उभे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय मैलाचा दगड ठरणार आहे.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना २०२६' मुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांची चिंता मिटली असून, बळीराजा पुन्हा एकदा नव्याने समृद्धीच्या वाटेवर वाटचाल करण्यास सज्ज झाला आहे.

**मनोज सुमन शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन




महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' चा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करुन नियमानुसार विहित वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एक रक्कमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे थकीत पीक कर्ज असल्यास, शासनाच्या निकषांमध्ये बसणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार असल्याची माहिती श्री. पोतंगले यांनी दिली. माहिती अपूर्ण असल्यामुळे कोणताही पात्र शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद पूर्ण करावी. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## आठवडाभर साखर आणि मीठ पूर्णपणे बंद केलं तर शरीरात काय बदल होतात?

अलीकडच्या काळात फिटनेस आणि निरोगी जीवनशैलीबाबत लोकांमध्ये जागरूकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे अनेकजण साखर आणि मीठ कमी करण्याचा किंवा पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेतात. जास्त प्रमाणात साखर आणि मीठ खाल्ल्याने लठ्ठपणा, उच्च रक्तदाब, मधुमेह आणि हृदयविकारांचा धोका वाढू शकतो, हे अनेक संशोधनांमधून समोर आलं आहे.

पण जर एखाद्या व्यक्तीने फक्त एक आठवड्यासाठी साखर आणि मीठ पूर्णपणे बंद केलं, तर शरीरात नेमके कोणते बदल होऊ शकतात? याबाबत तज्ज्ञांनी काही महत्त्वाची माहिती दिली आहे.

एक आठवडा साखर बंद केल्यावर काय होऊ शकतं?

१. गोड खाण्याची सवय कमी होऊ शकते

पहिले दोन ते तीन दिवस गोड खाण्याची तीव्र इच्छा होऊ शकते. कारण शरीराला साखरेची सवय झालेली असते. मात्र, हळूहळू ही इच्छा कमी होऊ लागते आणि शरीर कमी गोड खाण्याशी जुळवून घेतं.

२. शरीरातील ऊर्जा स्थिर राहू शकते

रिफाइंड साखर बंद केल्याने रक्तातील साखरेची पातळी वारंवार वाढणं आणि कमी होणं कमी होतं. त्यामुळे दिवसभर ऊर्जा टिकून राहते आणि अचानक थकवा किंवा सुस्ती जाणवत नाही.

३. वजन कमी होण्यास मदत होऊ शकते

साखरेमुळे शरीरात अतिरिक्त कॅलरीज जमा होतात. साखर कमी केल्याने या अतिरिक्त कॅलरीज कमी होतात आणि शरीरात चरबी साठण्याचं प्रमाणही कमी होऊ शकतं.

एक आठवडा मीठ बंद केल्यावर काय होऊ शकतं?

१. शरीरातील सूज कमी होऊ शकते

जास्त मीठ खाल्ल्यामुळे शरीरात पाणी साचून राहतं. मीठ कमी केल्यावर हे अतिरिक्त पाणी बाहेर पडण्यास मदत होते. त्यामुळे सूज कमी झाल्यासारखी जाणवू शकते.

२. रक्तदाब नियंत्रणात राहण्यास मदत होऊ शकते

ज्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे, त्यांच्यासाठी मीठाचं प्रमाण कमी करणं फायदेशीर ठरू शकतं. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत मिळू शकते.

३. कमजोरी आणि थकवा जाणवू शकतो

मात्र, मीठ पूर्णपणे बंद करणं प्रत्येकासाठी योग्य नाही. मिठामध्ये असलेलं सोडियम शरीरासाठी अत्यंत आवश्यक असतं. अचानक मीठ बंद केल्यास काही लोकांना चक्कर येणं, अशक्तपणा, डोके हलकं वाटणं किंवा थकवा जाणवू शकतो.

साखर आणि मीठ पूर्णपणे बंद करणं योग्य आहे का?

तज्ज्ञांच्या मते, रिफाइंड साखर कमी करणं फायदेशीर ठरू शकतं. मात्र, मीठ पूर्णपणे बंद करणं प्रत्येकासाठी योग्य नाही. कारण शरीराला योग्य प्रमाणात सोडियमची गरज असते.

त्यामुळे आहारात कोणताही मोठा बदल करण्यापूर्वी डॉक्टर किंवा आहारतज्ज्ञांचा सल्ला घेणं आवश्यक आहे. विशेषतः ज्यांना मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनीचे आजार किंवा इतर आरोग्यविषयक समस्या आहेत, त्यांनी स्वतःहून असे प्रयोग करू नयेत.

## कडू कारल्याला द्या चविष्ट ट्विस्ट! भरलेले कारले ते पनीर कारल्यापर्यंत १० भन्नाट रेसिपी



कारल्याचे नाव ऐकताच अनेक जण नाक मुरडतात. विशेषतः लहान मुलांना तर कारले अजिबात आवडत नाही. मात्र योग्य पद्धतीने बनवल्यास हेच कारले चवदार आणि पौष्टिक पदार्थात रूपांतरित होऊ शकते. कारल्यामध्ये व्हिटॅमिन सी, फायबर, लोह आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे ते आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. विशेषतः मधुमेह असलेल्या व्यक्तींसाठी कारले उपयुक्त मानले जाते.

अनेकांना वाटते की कारल्याची फक्त एक-दोन प्रकारची भाजी बनवता येते. पण प्रत्यक्षात कारल्यापासून अनेक स्वादिष्ट आणि पौष्टिक पदार्थ तयार करता येतात. भरलेले कारले, कांदा-कारले, कारले-पनीर, कारले-काजू आणि कारले-नारळ अशा विविध रेसिपी घरच्या घरी सहज बनवता येतात.

कारल्याची कडवट चव कमी करण्यासाठी काही सोपे उपायही करता येतात. कारले कापून त्यावर मीठ लावून २० ते ३० मिनिटे ठेवावे. तसेच हळद आणि मिठाच्या पाण्यात उकळल्यासही कडूपणा कमी होतो. कांदा, टोमॅटो, आमचूर आणि थोडासा गूळ वापरल्यास चव अधिक संतुलित होते.

सर्वात लोकप्रिय प्रकार म्हणजे कांदा-कारल्याची भाजी. यात कारले आणि कांदा बारीक कापून मसाल्यांसह मंद आचेवर परतले जातात. कांद्याच्या नैसर्गिक गोडव्यामुळे कारल्याची कडवट चव कमी होते.

भरलेले कारले हा आणखी एक लोकप्रिय प्रकार आहे. यामध्ये बडीशेप, धणे, आमचूर आणि इतर मसाले भरून कारले मंद आचेवर भाजले जाते. पोळी किंवा पराठ्यासोबत ही भाजी अतिशय स्वादिष्ट लागते.

कारले-बटाटा ही अनेक घरांमध्ये आवडीने बनवली जाणारी भाजी आहे. बटाट्यामुळे कारल्याची चव सौम्य होते. दोन्ही भाज्या वेगवेगळ्या तळून नंतर मसाल्यांसह शिजवल्यास त्याची चव अधिक खुलते.

कारले-टोमॅटोची भाजी देखील पौष्टिक आणि चविष्ट पर्याय आहे. टोमॅटोमधील आंबटपणा कारल्याची कडवट चव कमी करतो. ही भाजी कोरडी किंवा रस्सेदार अशा दोन्ही प्रकारे बनवता येते.

मसालेदार कारले मसाला हा खास प्रसंगी बनवण्यासारखा पदार्थ आहे. कुरकुरीत तळलेले कारले आणि मसालेदार ग्रेव्ही यांचा संगम या भाजीला वेगळीच चव देतो.

कारले-ढोबळी मिरचीची भाजीही चवीला भन्नाट लागते. ढोबळी मिरचीचा हलका गोडवा आणि कारल्याची खास चव यामुळे हा पदार्थ हेल्दी आणि लो-कॅलरी पर्याय ठरतो.

प्रोटीनयुक्त पदार्थ आवडणाऱ्यांसाठी कारले-पनीर हा उत्तम पर्याय आहे. मसालेदार ग्रेव्हीत पनीर आणि कारले एकत्र शिजवल्याने पौष्टिक आणि स्वादिष्ट भाजी तयार होते. ग्रामीण भागात कारले-वांगीची भाजी खूप लोकप्रिय आहे. वांगी आणि कारले मसाल्यांसह परतून बनवलेली ही भाजी पारंपरिक चवीचा अनुभव देते.

दक्षिण भारतीय शैलीतील कारले-नारळ भाजीही खूप प्रसिद्ध आहे. किसलेला नारळ, मोहरी आणि मसाल्यांच्या फोडणीमुळे या भाजीला वेगळीच चव मिळते. यामध्ये कारल्याचा कडूपणाही कमी जाणवतो.

कारले-काजू ही एक खास आणि श्रीमंत चवीची रेसिपी आहे. कुरकुरीत काजू, कारले, मसाले आणि थोडासा गूळ यांचा वापर करून तयार होणारी ही भाजी पाहुण्यांसाठीही उत्तम पर्याय ठरू शकते.

दररोजच्या जेवणात काहीतरी वेगळे आणि आरोग्यदायी खायचे असेल तर कारल्याच्या या दहा रेसिपी नक्की करून पाहा. योग्य पद्धतीने बनवलेले कारले केवळ चवदारच नाही तर आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते.

## रोज सकाळी रिकाम्या पोटी मेथीचं पाणी प्या; पचनाच्या समस्यांवर मिळू शकतो फायदा

आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असणारी मेथी ही फक्त मसाला नसून आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. अनेकजण मेथीचा वापर भाजी, पराठे किंवा विविध पदार्थांमध्ये करतात. मात्र, रोज सकाळी रिकाम्या पोटी मेथीचं पाणी पिण्याची सवय लावल्यास शरीराला अनेक प्रकारचे फायदे मिळू शकतात.

मेथीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि अनेक पोषक घटक असतात. त्यामुळे शरीराची कार्यक्षमता सुधारण्यास मदत होते. मात्र, हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की मेथीचं पाणी हा कोणत्याही आजारावरील उपचार नाही, तर निरोगी जीवनशैलीचा एक भाग आहे.

**वजन नियंत्रणासाठी फायदेशीर**

सकाळी दिवसाची सुरुवात मेथीच्या पाण्याने केल्यास चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) सुधारण्यास मदत होऊ शकते. यामुळे भूक नियंत्रणात राहण्यास मदत मिळते आणि दीर्घकाळ पोट भरल्यासारखे वाटते. संतुलित आहार आणि नियमित व्यायामासोबत मेथीचं पाणी घेतल्यास वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.

**पचनसंस्था मजबूत राहण्यास मदत**

मेथीमध्ये असलेले फायबर पचनक्रिया सुधारण्यास मदत करते. रिकाम्या पोटी मेथीचं पाणी प्यायल्याने बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आणि पोट फुगण्याच्या समस्यांमध्ये काही प्रमाणात आराम मिळू शकतो. तसेच आतड्यांच्या आरोग्यासाठीही ते फायदेशीर मानले जाते.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५३ वा राज्याभिषेक दिन रायगडावर उत्साहात साजरा

## रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य; गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस मान्यता देणार – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**रायगड –अलिबाग/प्रतिनिधी :** युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा तिथीनुसार ३५३ वा राज्याभिषेक दिन सोहळा आज दुर्गराज रायगडावर पारंपरिक उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून राज्य शासन कार्यरत असल्याचे सांगत रायगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी शासनाकडून सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, अशी ग्वाही दिली.

यावेळी व्यासपीठावर रोहयो मंत्री भरत गोगावले, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम, पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, शिवराज्याभिषेक दिनोत्सव सेवा समितीचे अध्यक्ष सुनील पवार, कोकण कडा मित्र मंडळ रायगडचे अध्यक्ष रोहित पवार, उपाध्यक्ष संकेत वडके तसेच लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी आपल्या भाषणात दुर्गराज रायगडाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. रायगडावरील पाण्याची समस्या कायमस्वरूपी दूर करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गुरुत्वाकर्षण आधारित पाणीपुरवठा योजनेस तातडीने मान्यता देण्यात येईल, असे त्यांनी जाहीर केले.



छत्रपती शिवाजी महाराजांनी महिलांच्या सन्मानाचा घालून दिलेला आदर्श शासनाच्या धोरणांत प्रतिबिंबित होत असून, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' कोणत्याही अडथळ्यांशिवाय निरंतर सुरू राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

यंदा पाऊस लांबल्याच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिलासा देताना त्यांनी सांगितले की, कमी पाऊस किंवा दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली तरी शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. शासकीय तिजोरीवर पहिला अधिकार अन्नदाता बळीराजाचाच आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले. तसेच, रायगडासह महाराष्ट्रातील युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळाचा दर्जा प्राप्त १२ ऐतिहासिक गड-किल्ल्यांचे जतन, संवर्धन आणि जागतिक स्तरावर त्यांची कीर्ती वृद्धिंगत करण्यासाठी शासन पूर्ण क्षमतेने कार्यरत राहील, असे आश्वासन त्यांनी दिले.

प्रास्ताविकात रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी रायगड किल्ला आणि पायथ्याशी असलेल्या ऐतिहासिक वास्तूंच्या जतन व पुनरुज्जीवनासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली. पाचाड येथे उभारण्यात येणाऱ्या 'शिवसृष्टी' प्रकल्पासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मंजूर करण्यात आलेल्या ५० कोटी रुपयांच्या निधीचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, या प्रकल्पासाठी शासनाने सुमारे ८० ते ८५ एकर जागा संपादित केली असून, आगामी मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकल्पास अंतिम मान्यता देऊन निधीत वाढ करण्यात यावी.

रायगड किल्ल्यावरील सखल भागातील भिंती, तटबंदी आणि पडझड झालेल्या ऐतिहासिक संरचनांच्या दुरुस्तीसाठी केंद्रीय पुरातत्त्व विभागाकडून येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी केंद्र शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात यावा, जेणेकरून संवर्धनाची कामे वेगाने पूर्ण होतील, अशी विनंतीही त्यांनी केली. तसेच, रायगड जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेवरील पडझड झालेल्या विश्रामगृहाच्या जागी आधुनिक व सुसज्ज विश्रामगृह उभारण्यात यावे, जेणेकरून गडावर येणाऱ्या शिवभक्तांना अधिक चांगल्या मुक्कामाची सुविधा उपलब्ध होईल, अशी मागणी त्यांनी केली. सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा प्रशासन तसेच सर्व शासकीय यंत्रणांनी केलेल्या समन्वयपूर्ण कार्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

सोहळ्याच्या प्रारंभी रायगड पोलीस दलाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांना शासकीय मानवंदना देण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात पालखी सोहळा राजसदरेवर दाखल झाला. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. त्यानंतर ढोल-ताशांचा गजर, पोवाडे, लोकनृत्ये, युद्धकला सादरीकरणे, शिवप्रेमी पथकांचे आकर्षक कार्यक्रम आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या घोषणांनी संपूर्ण रायगड परिसर शिवमय झाला.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा प्रशासनाने पोलीस विभाग, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महावितरण तसेच विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून आरोग्य, पिण्याचे पाणी, वाहतूक, पार्किंग, सुरक्षा आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

# लातूरमध्ये ३० जून रोजी 'एकल महिला धोरणा' बाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा

**लातूर/प्रतिनिधी:** राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेशीर, आरोग्यविषयक व पुनर्वसनासंदर्भातील प्रश्नांचा सर्वकष विचार करून त्यांच्यासाठी स्वतंत्र व प्रभावी धोरण तयार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा केली होती. त्यानुसार राज्यस्तरीय मसुदा समिती गठित करण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील नागरिक, एकल महिला, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक, तज्ज्ञ व्यक्ती व संबंधित विभागांचे अधिकारी यांच्याकडून सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी मंगळवार, ३०जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, लातूर येथे जिल्हास्तरीय बैठक व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेमध्ये प्रामुख्याने रोजगार व उपजीविका, मालमत्ता व वारसा हक्क, अपत्यांचे शिक्षण, निवारा व पुनर्वसन, शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतील सुधारणा, नवीन योजना व उपक्रमांविषयीच्या अपेक्षा, कायदेशीर अडचणी, पोटगी, न्यायालयीन दिरंगाई व प्रलंबित खटल्यांमधील सुधारणा, एकल महिलांची सुरक्षितता आणि सामाजिक सहभाग वाढवून रूढी-परंपरांमधील अडथळे दूर करणे या विषयांवर सविस्तर चर्चा करून अभिप्राय गोळा केले जाणार आहेत. या जिल्हास्तरीय बैठकीत प्राप्त होणारे नागरिकांचे अभिप्राय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार असल्यामुळे जिल्ह्यातील संबंधित घटकांनी, अभ्यासकांनी आणि माध्यम प्रतिनिधींनी या कार्यशाळेस लेखी स्वरूपात सूचनांसह उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी आधार व ॲग्रीस्टॅक नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेल्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' चा लाभ घेण्यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपला आधार क्रमांक चालू मोबाईल क्रमांकाशी संलग्न करून ॲग्रीस्टॅक पोर्टलवर नोंदणी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि अतिवृष्टीमुळे पीक कर्जाची वेळेत परतफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन राज्य शासनाने ही कर्जमुक्ती योजना लागू केली आहे. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेल्या आणि ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेल्या अल्पमुदत पीक कर्जाचा विचार करण्यात येणार आहे.

योजनेनुसार पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. यापूर्वीच्या कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती दिली जाणार आहे. तसेच सन २०२२-२३, २०२३-२४ आणि २०२४-२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांत पीक कर्जाची उचल करुन नियमानुसार विहित वेळेत परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त आहे, त्यांनी 'एक रक्कमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते कर्जमुक्तीसाठी पात्र ठरणार आहेत. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून लाभ मिळविण्यासाठी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांकडे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच राष्ट्रीयकृत बँकांचे थकीत पीक कर्ज असल्यास, शासनाच्या निकषांमध्ये बसणाऱ्या शेतकऱ्यांना कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. तर नियमित कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ मिळणार असल्याची माहिती श्री. पोतंगले यांनी दिली.

माहिती अपूर्ण असल्यामुळे कोणताही पात्र शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी बँक खाते, मोबाईल क्रमांक आणि जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद पूर्ण करावी. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण आणि ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# लातूर आरटीओची परराज्यात नोंदणीकृत प्रवासी बसेसवर धडक कारवाई

**लातूर/प्रतिनिधी:** प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परराज्यात नोंदणी असलेल्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवासी बसेसवर कडक कायदेशीर कारवाईची धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील तरतुदींनुसार, एखादे वाहन मूळ नोंदणीकृत राज्याव्यतिरिक्त दुसऱ्या राज्यात निश्चित कालावधीपेक्षा जास्त काळ वापरले जात असल्यास, संबंधित राज्यात त्या वाहनाची पुर्ननोंदणी करणे आणि लागू असलेला स्थानिक मोटार वाहन कर भरणे कायद्याने बंधनकारक असते. परंतु, अनेक परराज्यात नोंदणीकृत असलेली वाहने महाराष्ट्र राज्यात आणि विशेषतः लातूर परिसरात दीर्घकाळ कर न भरता व नियमांचे उल्लंघन करून वापरात असल्याचे निदर्शनास येत होते. या बाबीचा गांभीर्याने विचार करून राबविण्यात आलेल्या या मोहिमेमध्ये प्रामुख्याने परराज्यातील प्रवासी वाहनांद्वारे केली जाणारी करचुकवेगिरी, तसेच प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'आपत्कालीन दरवाजा' समोर अडथळे निर्माण करणे यांसारख्या गंभीर गुन्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

या कारवाई अंतर्गत लातूर आरटीओच्या वायुवेग पथकाद्वारे मोठी कामगिरी बजावण्यात आली असून, यामध्ये माहे मे २०२६ मध्ये ४८ दोषी वाहनांवर कारवाई करून ७ लाख ५७ हजार ०९९ रुपये दंड वसूल करण्यात आला, तर माहे जून २०२६ मध्ये १७ दोषी वाहनांवर कारवाई करत ५ लाख ९२ हजार ७६५रुपये इतका एकूण दंड वसूल करण्यात आला आहे. परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आदेशानुसार परराज्यात नोंदणीकृत वाहनांबाबतची ही विशेष तपासणी मोहीम ३० जून २०२६ पर्यंत राबविण्यात येत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय येथील वायुवेग पथकाद्वारे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम युद्धपातळीवर सुरू असून, भविष्यातही प्रवाशांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आणि करचुकवेगिरीस आळा घालण्यासाठी अशा प्रकारची कडक कारवाई यापुढेही सातत्याने सुरू राहील, अशी माहिती लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.



# श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात शिवराज्याभिषेक दिन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि.२७ जून २०२६ शनिवार रोजी शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सरस्वती माता व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, पर्यवेक्षक अंजली निर्मळे, राम जोशी, अभ्यासपूरक मंडळ प्रमुख बालासाहेब करपुडे, क्रीडा शिक्षक गुरुनाथ झुंजारे व इयत्ता सहावीतील विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# नि:स्वार्थ ज्ञानदान, समाज प्रबोधन आणि मानवतावादी मूल्यांची जपणूक करणारा मार्गदर्शक म्हणजे प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख

**लातूर/प्रतिनिधी:** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे आधारस्तंभ व अमरावती पदवीधर मतदार संघांचे सलग पाच वेळा प्रतिनिधित्व केलेले आमदार प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांचे शुक्रवार दि.१९ जून २०२६ रोजी दुख:द निधन झाले. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी लातूर जिल्ह्यातील समस्त प्राध्यापकांच्यावतीने दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या सभागृहात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी प्रास्ताविक करताना डॉ.अमोल लाटे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांनी नुटा व एमफुक्टो प्राध्यापक संघटनेच्या माध्यमातून शिक्षक चळवळीत काम करताना वेतनश्रेणीतील सुधारणा, सेवा संरक्षण, निवृत्तीवेतन लाभ, १९९४चा विद्यापीठ कायदा, विद्यापीठीय सुधारणांचा लाभ, शैक्षणिक धोरणांमध्ये प्राध्यापकांना प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी सातत्यपूर्ण संघर्ष केला. शिक्षक चळवळीला वैचारिक




अधिष्ठान देण्यासाठी त्यांनी नुटा बुलेटीन हे प्रभावी माध्यम उभारले.

प्राचार्य डॉ.संग्राम मोरे म्हणाले की, आपल्याला मिळालेले वैभव हे केवळ प्रा.बी.टी.(भाऊ) यांच्यामुळे मिळाले आहे. पाचव्या वेतनामध्ये ग्रंथपालाचा समावेश असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. ते हक्काच्या भाषेसोबत कर्तव्याची जाणीवही करून द्यायचे. त्यांच्या विचाराचा वारसा आपल्याला भविष्यामध्ये चालवायचा आहे.

डॉ.दीपक चाटे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांच्या निधनाची बातमी ही मनाला वेदना देणारी होती. सैनिक ज्याप्रमाणे सीमेवर लढतात त्यामूळे आपण शांत झोपू शकतो अशाच प्रकारचे कार्य त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभर केले. त्यांनी तीस वर्ष विधान परिषदेचे सदस्य म्हणून प्रतिनिधित्व केले. शैक्षणिक कार्यासोबत जलसिंचनाचे कार्य सुद्धा अत्यंत प्रेरणादायी आहे. प्रा.बी.टी.(भाऊ) म्हणजे निस्वार्थ, प्रामाणिक आणि कार्यनिष्ठ जपणारे व्यक्तिमत्व होतं.

डॉ.सतीश यादव म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी आपले संपूर्ण आयुष्य संघटनेच्या उभारणीसाठी घालविले आहे. चळवळीचा कार्यकर्ता हा सच्चा आणि सात्विक असावा असे त्यांचे मत होते. ते राजकीय दृष्ट्या अत्यंत अभ्यासू व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वांना परिचित होते. आज आपल्यामध्ये भाऊ नाही परंतु आपल्या मधूनच अनेक भाऊ तयार व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

विश्वंभर भोसले म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांच्या सोबत अनेक बैठकांना उपस्थित राहण्याचा योग आला. त्यावेळी ते अत्यंत अभ्यासपूर्ण विवेचन करायचे. त्यांनी आयुष्यभर वैयक्तिक काम कधीही कुणाला सांगितले नाही तर सातत्याने समाजाचे प्रश्न त्यांनी सोडविण्याचा प्रयत्न केला. आज आपल्याला शिक्षण वाचवा, देश वाचवा यासाठी लढावे लागणार आहे.

डॉ.वाय.पी.सारणीकर म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी प्राध्यापकांच्या संरक्षणासाठी सातत्याने कार्य केले. संप कालावधीतला पगार सुद्धा त्यांच्या अथक परिश्रमामुळेच सर्वांना मिळाला.

डॉ.जयद्रथ जाधव म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) म्हणजे संघटनेचा मुख्य आधारवड होता. विधानसभा व विधान परिषदेमध्ये त्यांनी निस्वार्थ नेतृत्व केले. आजही त्यांची निष्ठा आणि कर्तुत्व आपल्या सर्वांसमोर आहे. आज आपण आपले मतभेद, मनभेद आणि स्वार्थ बाजूला ठेवून एकत्र येणे आवश्यक आहे. त्यांच्या भाषणामुळे सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये सामर्थ्य निर्माण होत असे.

डॉ.विष्णू पवार म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) यांनी विधान परिषदेमध्ये शिक्षकासोबतच् शेतकरी आणि शेतमजुरांचे सुद्धा प्रश्न मांडले. त्यांची वाणी अलौकिक होती, त्यामुळे सत्ताधारी आणि विरोधक सुद्धा त्यांचे भाषणे एकाग्रतेने ऐकायचे.

डॉ.महेश बेंबडे म्हणाले की, प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख हे सर्वव्यापी व्यक्तिमत्व होते. त्यांनी समाजातील सर्व प्रश्नांना विधिमंडळामध्ये वाचा फोडली आणि शिक्षण क्षेत्रामध्ये एक नवा पॅटर्न त्यांनी निर्माण केला.

यावेळी लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.डी.आर.भूरे यांनी केले. सर्वात शेवटी दोन मिनिट स्तब्ध राहून प्रा.बी.टी.(भाऊ) देशमुख यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# उपवर्गीकरणाविरोधात लातूरात ६ जुलैला भव्य महामोर्चा; ५० हजारांहून अधिक नागरिक सहभागी होणार

**लातूर/प्रतिनिधी:** अनुसूचित जातींच्या आरक्षणामध्ये प्रस्तावित उपवर्गीकरणाच्या विरोधात अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती, आंबेडकरवादी पक्ष-संघटना तसेच संविधानवादी नागरिकांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, दि. ६ जुलै २०२६ रोजी लातूर येथे 'अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा' आयोजित करण्यात आल्याची माहिती आज पत्रकार भवन, लातूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा समिती लातूरच्या वतीने देण्यात आली.

हा महामोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सकाळी सुरू होऊन जुने जिल्हाधिकारी कार्यालय (जिल्हा परिषद गेट) येथे धडकणार आहे. मोर्चामध्ये अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचे प्रतिनिधी, आंबेडकरवादी संघटना, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच विविध सामाजिक घटक मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

आरक्षणामध्ये कोणत्याही प्रकारचे उपवर्गीकरण होऊ नये, अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे संरक्षण व्हावे आणि सामाजिक न्यायाचे तत्त्व अबाधित राहावे, ही या महामोर्चाची प्रमुख भूमिका असल्याचे समितीने स्पष्ट केले.

महामोर्चाच्या माध्यमातून राज्य शासनाकडे अनुसूचित जातींसाठी शासकीय सेवांमधील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला अनुशेष तात्काळ भरावा, सर्व रिक्त आरक्षित पदे विशेष भरती मोहिमेद्वारे भरण्यात यावीत तसेच अनुसूचित जातींच्या घटनात्मक हक्कांचे प्रभावी संरक्षण करण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. या महामोर्चाला रिपब्लिकन सेनेचे सरसेनानी आनंदराज आंबेडकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कॅबिनेट मंत्री बबनराव घोलप, हे उपस्थित राहणार आहेत तसेच कॅबिनेट माजी कॅबिनेट मंत्री राजकुमार बडोले व सबंध लातूर जिल्ह्यातील सर्व आंबेडकरवादी पक्ष संघटनेचे चळवळीतील नेते कार्यकर्ते या महामोर्चाला उपस्थित राहणार आहेत

लातूर जिल्ह्यातील विविध समाजघटकांचा या आंदोलनाला व्यापक पाठिंबा मिळत असून सुमारे ५० हजार ते १ लाख नागरिक या महामोर्चात सहभागी होतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. हा महामोर्चा पूर्णपणे शांततापूर्ण, लोकशाही मार्गाने आणि संविधानिक पद्धतीने आयोजित करण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेमार्फत अनुसूचित जातीतील सर्व ५९ जाती, आंबेडकरवादी पक्ष-संघटना, संविधानवादी नागरिक तसेच सामाजिक न्यायावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व नागरिकांना दि. ६ जुलै रोजीच्या महामोर्चात मोठ्या संख्येने लातूर जिल्ह्यातील सर्व खेड्यापाड्यासह सर्व तालुक्यातून हजारो लाखो समाज बांधवांनी या मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. या पत्रकार परिषदेस अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी महामोर्चा समिती लातूरचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पल्स पोलिओ लसीकरण मोहीम अंतर्गत ३९३९७ बालकांना दिली लसीची मात्रा



**लातूर/प्रतिनिधी:** दनांक २८ जून रोजी केंद्रशासन तसेच राज्य शासन यांच्याकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचे आयोजन करण्यात आले.

सदर मोहिमेचे उद्घाटन माता रमाई आंबेडकर स्त्री रुग्णालय लातूर येथे शहराच्या प्रथम नागरिक तथा महापौर जयश्रीताई सोनकांबळे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, नगरसेवक सचिन गायकवाड, इब्राहिम शेख तसेच उपायुक्त श्रीमती वसुधा फड व स्त्री रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर शिवशंकर नागापुरे तसेच स्त्री रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी व आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती व त्यांच्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत पार पाडला.

४२,८२३ लाभार्थींना (० ते ५ वर्ष वयोगटातील) पोलिओची मात्रा पाजण्याचे उद्दिष्ट लातूर शहर महानगरपालिकेस निर्धारित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने आरोग्य विभागाने हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शहरांमध्ये २४० ठिकाणी बुध कार्यान्वित केले होते. ३९३९७ (९२%) एवढ्या पात्र बालकांना पोलिओ लसीची मात्रा पाजण्यात आली. यामध्ये बूथवर लस पोचवण्याकरिता निवासी उपजिल्हाधिकारी श्री केशव नेटके यांनी काढलेल्या वाहनअधिग्रहण आदेशामूळे ही मोहीम यशस्वी होण्यास मोलाची मदत झाली.

यामध्ये शहरातील विविध नर्सिंग कॉलेज मधील विद्यार्थी तसेच मांजरा आयुर्वेदिक कॉलेज येथील विद्यार्थी तसेच आरोग्य विभागातील आशा स्वयंसेविका, अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य कर्मचारी, आरोग्य सहाय्यक पार्श्वनाथ पाटील यांच्या सहकार्याने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडण्यात आली.

दिनांक ३० जून २०२६ ते ४ जुलै २०२६ पर्यंत आरोग्य कर्मचाऱ्यामार्फत उर्वरित बालके यांना ग्रहभेटीद्वारे पोलिओची मात्रा पाजण्यात येणार आहे. तरी गृहभेटीस येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यास सहकार्य करून आपल्या पात्र बालकांना ही मात्रा देण्यात यावी असे आवाहन लातूर शहर महानगरपालिका मार्फत करण्यात येत आहे.

## तुकाराम बळदे यांचा मित्र परिवाराकडून सत्कार



**नळेगाव/अजगर मजकुरी:** तुकाराम बळदे बिट अमालदार यांचा नळेगाव पोलीस चौकी येथे मित्रपरिवाराकडून सत्कार करुन शुभेच्छा दिल्या सोबत हानमंत भाऊ लवटे पाटील (राष्ट्रवादी चाकूर तालुका उपाअध्यक्ष ) दत्ता नरवाडे शिवसेना चाकूर तालुका समन्वयक तसेच स्वराज हॉटेल चे मालक राहुल राजे कोकाटे तसेच पोलीस रत्नाकर जाधव साहेब, गोविंद मलवाडे साहेब ,पत्रकार अशोक बिराजदार तसेच पत्रकार अजगर मजकुरी दिसत आहेत.

# आर्य वैश्य युथ, लातूरच्या वतीने गुणवंतांचा गौरव; वासवी कन्याका भूषण पुरस्कारांचे वितरण



**लातूर/प्रतिनिधी:** आर्य वैश्य युथ, लातूर यांच्या वतीने इयत्ता १०वी, १२वी व डिप्लोमा मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी अग्रसेन भवन, लातूर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक अध्यक्ष मा. प्रदीपजी कोकड (परभणी) हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रतिष्ठित उद्योजक मा. दीपकजी कोटलवार व पंचायत समिती सदस्य, चाकूर मा. शिवम देवशटवार उपस्थित होते. तसेच मंचावर लातूर आर्य वैश्य युथचे जिल्हाप्रमुख व्यंकटेश देवशेटवार, अध्यक्ष विठ्ठल तगलपल्लेवार, उपाध्यक्ष प्रीतम कोंडेवार, सचिव अजय कोटलवार हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी आर्य वैश्य युथ लातूर पुरस्कृत 'वासवी कन्याका भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आले. श्री सूर्यकांतजी कोकडवार (परभणी) यांना राज्यस्तरीय तर श्री सुरेशजी पेन्सलवार (लातूर), श्री दत्तात्रयजी कोटलवार (लातूर), श्री दीपकजी कोटलवार (लातूर) व सौ. उषाजी बट्टेवार (लातूर) यांना जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. टाईम्स पब्लिक स्कूल, उदगीरचा विद्यार्थी ईशान बंडेवार याने १००% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. त्याच्यासह ८०% पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या समाजातील इतर ३० गुणवंतांचा शाल, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व शमीचे रोपटे देऊन गौरव करण्यात आला.

जिल्हा अध्यक्ष विठ्ठल तगलपल्लेवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन श्रीनाथ चिद्रेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन आर्य वैश्य युथचे मराठवाडा सचिव निखिल गुजलवार यांनी मानले.

कार्यक्रमास लातूर जिल्हा आर्य वैश्य महासभेचे अध्यक्ष श्री गजानन पारसेवार, सचिव श्री अतुल कोटलवार, महिला महासभेच्या अध्यक्षा सौ. मीरा देवशटवार, नगेश्वर मंदिराचे सचिव श्री सुनील बच्चेवार व शहरातील प्रतिष्ठित नागरिक, पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कोषाध्यक्ष सचिन पापीनवार, संघटन प्रमुख स्वप्निल देबडवार, कायदेशीर सल्लागार ॲड. विश्वदीप कोटलवार, आर्य वैश्य युथ जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अविनाश बट्टेवार, केदार बट्टेवार, योगेश कवठेकर, बालाजी मद्रेवार, गोविंद कामठाणे, अनिरुद्ध कामठाणे, प्रसाद बावगे व सर्व पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जनकल्याण निवासी विद्यालयात हिंदू साम्राज्य दिन उत्साहात साजरा




**लातूर/प्रतिनिधी:** हरंगुळ (बु.), ता. लातूर : येथील जनकल्याण निवासी विद्यालयात हिंदू साम्राज्य दिन तथा शिवराज्याभिषेक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी व्यासपीठावर इतिहास संकलन समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. भास्करराव ब्रम्हनाथकर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तसेच विद्यालयाचे अधीक्षक श्री. दत्ता माने व सहअधीक्षक श्री. बाबासाहेब मते यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्री. भास्करराव ब्रम्हनाथकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यकारभारातील प्रशासन व्यवस्था, लोककल्याणकारी धोरणे, स्त्रियांचा सन्मान, धर्मांबद्दलचा आदर आणि प्रजेच्या हिताला दिलेले सर्वोच्च प्राधान्य याविषयी सविस्तर विवेचन केले. त्यांच्या नेतृत्वातून नियोजन, दूरदृष्टी, परिश्रम, शिस्त आणि संकटांवर मात करण्याची प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी हे गुण आपल्या दैनंदिन जीवनात आचरणात आणावेत, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय श्री. सागर कद्रे यांनी करून दिला. कार्यक्रमास पालक-पर्यवेक्षक, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर समाचार
www.latursamachar.com
वर रोज वाचा
ऑनलाईन....

## वटपौर्णिमा...

वट पौर्णिमेचा सण
गाई सावित्रीचे गुण
आणले यमा कडून
सत्य वाहनाचे प्राण
यमधर्म सांगतो मर्म
काय बोलते पुराण
कहाणी होई कारण
वटवृक्ष महत्व जाण
पुजा करा मनोभावे
झाडं निसर्गाचे प्राण
जपू नीट पर्यावरणा
आज घ्यायची आण
नश्वर आहे हे शरीर
अटळनिश्चित मरण
जगणे सुरेखअसावे
आयुष्य हो उध्दरण
गं धर्म केवळ कारण
शास्त्रांचे देते स्मरण
निमित्ताने सण वार
करते संस्कृती रक्षण
सत्यवान न् सावित्री
बनणे असेलकठीण
मनगटी अद्भुतशक्ति
बांगडीची किणकिण
नारीपुरुष अर्धे असे
पहा एक दुज्यावीण
निमित्ते दृढ होत राहे
पती पत्नी नाते वीण

**हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# संघटन शक्तीनेच शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील

## शेतकरी मेळाव्यात दादा लाड यांनी दिला शेतकऱ्यांना विश्वास



**लातूर/प्रतिनिधी:** शेतीतील संशोधन व आधुनीक तंत्रज्ञानाचा वापर यातून वाढलेले उत्पन्न तसेच शेतकर्यांनी संघटीत होऊन लढा दिला तर शेतकर्यांचे प्रश्न सुटतील व त्यांना सन्मानाने आपले जीवनमान जगता येईल. त्यासाठी भारतीय किसान संघ राज्यभर शेतकर्यांचे मेळावे घेत असून या मेळाव्याच्या माध्यमातून शेतकर्यांना संघटीत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. शेतकर्यांच्या अनेक अडचणी असल्या तरी त्यावर मात करण्यासाठी संघटन महत्वाचे असल्याचे सांगून भारतीय किसान संघाच्या माध्यमातून यापुढीलच्या काळात आपल्याला तीव्र संघर्ष करावा लागेल, असे प्रतिपादन पद्मश्री कृषी संशोधक डॉ. श्रीरंगदादा लाड यांनी राजूर (अहमदपूर) येथील भव्य शेतकरी मेळाव्यात केले.

भारतीय किसान संघाच्या वतीने राजूर येथील रूद्धा पाटीजवळील साईगणेश मंगल कार्यालयात हा मेळावा आयोजीत करण्यात आला होता. या मेळाव्यात डॉ. श्रीरंगदादा लाड हे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय किसान संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येलाले, माजी आ. बब्रुवान खंदाडे, तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे, निवृत्त सिंचन सचिव घोटे, महिला विभाग प्रमुख शामलताई हुरदळे आदीसह संघ स्वयंसेवक व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी भारतीय किसान संघाच्या वतीने तालुक्यातील प्रगतशील शेतकर्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना श्रीरंगदादा लाड म्हणाले, शेतकर्यांच्या उत्पन्नावरच देशाचे उत्पन्न अवलंबून असून शेतीचे उत्पन्न वाढले पाहिजे यासाठी शेतकर्यांनी तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. तंत्रशुद्ध पद्धतीने विक्रमी उत्पन्न मिळू शकते असा आपला अनुभव असून कापूस या पिकावर आपण प्रयोग करून एकरी २५ क्विंटल कापूस उत्पादीत होऊ शकते हे संशोधनातून आपण यापूर्वी सिद्ध केले आहे. तसेच या पुढील काळात शेतकर्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी यासाठी अनेक नवनवीन प्रयोग करण्याचा आपला संकल्प असून ज्वारीच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी संशोधन सुरू आहे. एकरी किमान ५० क्विंटल ज्वारीचे उत्पन व्हावे याबाबत संशोधन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेतीचे उत्पन्न वाढीबरोबरच शेतमालाला योग्य ती किंमत मिळण्यासाठी आपण सर्वजण एकत्र येऊन संघर्ष उभा करावा लागेल, अशी भूमिका डॉ. लाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून व्यक्त केली. यावेळी तालुका कृषी अधिकारी सचिन बावगे, निवृत्त सिंचन सचिव घोटे, मधुमक्षीका पालक दिनकर पाटील आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात माजी आ. बब्रुवान खंदाडे यांनी शेतकर्यांचे उत्पन्न दुप्पट झाले पाहिजे. त्यासाठी सरकार दरबारी अनेक योजना असल्या तरी तंत्रज्ञानाचा शेतकर्यांनी स्वीकार करून शेतीतील उत्पन्न वाढविण्यासंदर्भात प्रयत्नशील असणे गरजेचे आहे. शेतीतून अधिक उत्पन्न मिळविण्यासोबतच कृषीमाला योग्य तो देऊन सरकारने शेतकर्यांना समाधानी करणे गरजेचे आहे. भारतीय किसान संघाचे काम शेतकर्यांच्या संघटीत व उत्पन्न वाढीसाठी असल्याचे सांगून शेती व शेतकर्यांना सन्मान मिळावा यासाठी भारतीय किसान संघ संपूर्ण देशभर वेगवेगळे अभियान व उपक्रम राबवून शेतकर्यांचे विविध प्रश्न शासन दरबारी मांडत आहे. शेतकर्यांना पीक विमा, पिक विम्या संदर्भातील जाचक अटी याबाबतच्या समस्यांचे त्यांनी उपस्थितांसमोर मांडून याबाबत किसान संघाने यावर सरकार दरबारी भावना पोहचविण्याचे काम करावे, अशी अपेक्षाही माजी आ. खंदाडे यांनी व्यक्त केली.

यावेळी माजी सभापती अशोककाका केंद्रे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, भाजपचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, राजूर (अहमदपूर) नगराध्यक्ष स्वप्नील व्हते, माजी नगराध्यक्ष ॲड. भारत चामे, माजी जि. प. सदस्य त्रिंबक गुट्टे, राजकुमार मजगे, नगरसेवक सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, माजी सभापती अनुसयाताई केंद्रे यांच्यासह महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल नरहारे व गोविंद गिरी यांनी केले तर आभार राजकुमार मजगे यांनी मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## लातूर जिल्ह्यात चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद

लातूर, दि. २९ (जिमाका) : जिल्ह्यात २९ जून रोजी सकाळी आठ वाजता संपलेल्या चोवीस तासांत सरासरी १३.९ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये रेणापूर तालुक्यात सर्वाधिक २९.७ मिलीमीटर, तर देवणी तालुक्यात सर्वात कमी १.२ मिलीमीटर पाऊस झाला आहे.

तालुकानिहाय पावसाची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे- लातूर- २१.७, औसा- ६.०, अहमदपूर- १४.४, निलंगा- १.९, उदगीर- १६.२, चाकूर- २१.०, रेणापूर- २९.७, देवणी- १.२, शिरूर अनंतपाळ- १३.३ आणि जळकोट- १५.७ मिलीमीटर.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क → Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट
ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade    Mo. 9422472502,    RNI 47034/64,    POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६